**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की**

**सं.फौ.ख.क्र.६०/२०२१**
**नकीब विरूध्द भुषण**
**निशाणी – ३०**

**पुढील सरतपास फिर्यादी तर्फे वकील श्री. सउद अफसर यांच्या कडून –**

१२. मला आता माझे निशाणी ३० कडील सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखविले. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर मी सहया केल्या आहे.

१३. मला आता निशाणी ३२/१ कडील मुळ धनादेश दाखविला. सदरचा चेक आरोपीने मला दिला होता तो रक्कम रू.४ लाखाचा आहे. त्यावर आरोपीची सही आहे. तो चेक दि.२३.११.२०२० रोजीचा असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ३४** देण्यात येते.

१४. मला आता निशाणी ३२/२ कडील चेक रिटर्न मेमो दाखविला. तो तोच आहे. त्यावर बँकेचा शिक्का व सही आहे. तो दि. ०३.१२.२०२० रोजी परत आल्याचा मेमो आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ३५** देण्यात येते.

१५. मला आता निशाणी ३२/३ कडील नोटीस दाखविली. सदरची नोटीस ॲड. सउद अफसर यांच्यामार्फत मी आरोपीला पाठविलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझ्या वकीलांची सही आहे ती मी ओळखतो. त्यास **निशाणी ३६** देण्यात येते.

१६. मला आता निशाणी ३२/४ कडील बंद लखोटा दाखविला. सदरचा लखोटा पोस्टाकडून परत आला असून आरोपीला पाठविलेली त्याने स्वीकारली नसल्याचे दिसून येते. त्या बंद लखोटयास **निशाणी ३७** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. गजवे यांनी मुदतीचा अर्ज दाखल केल्याने पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.07.11 15:43:57 +0530

कामठी
दिनांक १०/०७/२०२५

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी